असा. क्र. ३५

रजिस्टर्ड नं. एमएच/एमबीआय-साऊथ/२०/२०००

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

सोमवार, एप्रिल १७, २००० /चैत्र २८, शके १९२२

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम**

### अनुक्रमणिका


| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४.**——महाराष्ट्र राज्यातील कृषीतर, तांत्रिकेतर व वैद्यकेतर विद्यापीठांमधील प्राधिकरणे व मंडळे यांच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलण्याची तरतूद करण्याकरिता अधिनियम. | २१८–२२० |


दिनांक ११ एप्रिल २००० रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**प्रतिमा उमरजी,**
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

### सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक १७ एप्रिल २००० रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र राज्यातील कृषीतर, तांत्रिकेतर व वैद्यकेतर विद्यापीठांमधील प्राधिकरणे व मंडळे यांच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलण्याची तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

१९९४ चा महा. ३५. **ज्याअर्थी,** महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ यामध्ये अन्य सदस्यांबरोबरच, निवडून दिलेल्यां सदस्यांचाही समावेश असलेली निरनिराळी विद्यापीठ प्राधिकरणे किंवा मंडळे यांची रचना धरण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे ;

**आणि ज्याअर्थी,** विद्यापीठांच्या निरनिराळ्या प्राधिकरणांमध्ये व मंडळांमध्ये समाजातील निरनिराळ्या वर्गांना तसेच महिलांनाही प्रतिनिधित्व देण्याची तरतूद करणे आणि विद्यापीठांच्या कामकाजाचे सुसूत्रिकरण करण्यासाठी इतर विवक्षित तरतुदी करणे यासाठी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ यात सुधारणा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या प्रत्यक्ष विचाराधीन आहे ; १९९४ चा महा. ३५.

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र शासनाकडून या सुधारणा लवकरात लवकर करण्यात येणार असल्याने, विद्यापीठाची प्राधिकरणे किंवा इतर मंडळे यांमधील निवडून आलेल्या सदस्यांची रिक्त पदे भरण्यासाठी घ्यावयाच्या आगामी निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलणे इष्ट आहे, असे शासनाला वाटले ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** विद्यापीठ प्राधिकरणे व इतर मंडळे यांच्या सदस्यांच्या निवडणुका पुढे ढकलण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तातडीने कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, आणि, म्हणून महाराष्ट्राच्या राज्यपालांनी दिनांक ४ मार्च २००० रोजी महाराष्ट्र विद्यापीठे (विद्यापीठ प्राधिकरणे व इतर मंडळे यांच्या सदस्यांच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलणे) अध्यादेश, २००० हा प्रख्यापित केला होता; २००० चा महा. अध्या. ५.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या एकावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र विद्यापीठे (विद्यापीठ प्राधिकरणे व इतर मंडळे यांच्या सदस्यांच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलणे) अधिनियम, २००० असे म्हणावे.

(२) तो दिनांक ४ मार्च २००० रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

विद्यापीठाची प्राधिकरणे व इतर मंडळे यांच्या सदस्यांच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलणे.

**२.** महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) यामध्ये किंवा याअन्वये केलेल्या कोणत्याही परिनियमांमध्ये किंवा आदेशांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, हा अधिनियम अंमलात आल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांचा कालावधी संपेपर्यंत किंवा त्या अगोदर मुख्य अधिनियमांत सुधारणा होईपर्यंतच्या दिनांकापर्यंत (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त कालावधी " असा करण्यात आला आहे), कोणत्याही विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणांच्या किंवा इतर कोणत्याही मंडळांच्या कोणत्याही निवडून आलेल्या सदस्यांचे रिक्त पद—मग ते त्याचा कालावधी संपल्यामुळे झालेले असो किंवा ते अन्य कोणत्याही कारणात्तव रिक्त झालेले असो—भरण्यासाठी कोणतीही निवडणूक घेण्यात येणार नाही. १९९४ चा महा. ३५.

विद्यापीठाची प्राधिकरणे व इतर मंडळे यांच्या सदस्यांच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलण्याचे परिणाम.

**३.** मुख्य अधिनियमामध्ये किंवा त्या अन्वये केलेल्या कोणत्याही परिनियमांमध्ये किंवा आदेशांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मुख्य अधिनियमान्वये स्थापन केलेल्या कोणत्याही विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाने किंवा कोणत्याही मंडळाने, उक्त कालावधीत केलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही ही, अशा कोणत्याही प्राधिकरणात किंवा मंडळात निर्माण झालेली जी रिक्त पदे निवडणुकीद्वारे भरणे आवश्यक होते, ती पदे तशी भरण्यात आली नाहीत, केवळ याच कारणावरून अवैध ठरणार नाही.

**सन २००० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ चे निरसन.**

२००० चा महा. अध्या. ५. ४. महाराष्ट्र विद्यापीठे (विद्यापीठ प्राधिकरणे व इतर मंडळे यांच्या सदस्यांच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलणे) अध्यादेश, २००० हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई